ePaper
# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचं साताऱ्यात स्वागत!



| वर्ष - 7 | अंक -53 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- येत्या पावसाळ्यात पुन्हा पुणे खड्ड्यांत!
- 'मोदी@9 जनसंपर्क
- सत्तेतील कुरघोडी!

www.mahaenews.com | ।सोमवार, दि. 19 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'कुपोषित' व्यवस्थेच्या गर्भवती?

## 5 महिन्यापासून आहार मिळेना : महापालिका प्रशासनाच्या डोळ्यांवर पट्टी!

### माहिती अधिकार कार्यकर्ते दिपक खैरनार यांची विभागीय आयुक्तांकडे तक्रार

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये गर्भवती महिलांसाठी 'जननी सुरक्षा' योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या आहार पुरवठ्यासाठी नियुक्त असणाऱ्या ठेकेदाराची मुदत गेल्या फेब्रुवारी महिन्यात संपलेली आहे. त्यामुळे गेल्या पाच महिन्यांपासून गर्भवती महिलांना करण्यात येणारा 'आहार पुरवठा' बंद असल्यामुळे शहरातील हजारो मातांची गैरसोय होत आहे. त्यामुळे या प्रकरणाची दखल घेऊन तात्काळ निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच हि योजना पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली आहे.**



याबाबत दिपक खैरनार यांनी पुण्याचे विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये गोर-गरीब तसेच आर्थिक दुर्बल घटकातील महिला प्रसुतीसाठी दाखल होतात. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना त्रास होऊ नये, याकरीता शासनाच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविल्या जातात. विशेषतः या महिलांना योग्य आहार आणि औषधोपचार मिळावा, यासाठी या योजना आहेत. परंतु दाखल मातांना जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत देण्यात येणारा आहार बंद झाला आहे. आहाराचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराची मुदत संपल्याने गेल्या पाच महिन्यांपासून आहार दिला जात नाही. त्यामुळे पिंपरी महापालिका रुग्णालयातील मातांची गैरसोय होत असून अनेकांना पैसे खर्च करून आहाराची सोय करण्याची वेळ येत आहे. यामुळे गर्भवती महिलांना योग्य आहार मिळतो की नाही? याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

परंतू महापालिका प्रशासनाला याचे कोणतेही सोयर-सुतक उरले नसल्याचे दिसून येत आहे. ठेकेदाराची मुदत फेब्रुवारीमध्येच संपल्यानंतर महापालिकेमार्फत तातडीने निविदा प्रकिया राबविणे गरजेचे होते. मात्र संबंधित विभागाचे अधिकारी पूर्वीच्याच ठेकेदारावर आपली मर्जी दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. गर्भवती महिलांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नापेक्षा संबंधित ठेकेदारालाच निविदा प्रक्रिया न राबविता मुदत वाढ कशी मिळवून देता येईल, यासाठी अधिकारी वर्ग हा अधिक प्रयत्नशील असल्याची चर्चा प्रशासकीय यंत्रणेत सुरू आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या अट्टाहासापायी पालिका प्रशासनाने अशा प्रकारे शासनास अंधारात ठेऊन स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया न राबविता ठेकेदारास मुदतवाढ देणे योग्य नाही. त्यामुळे पूर्वीच्या ठेकेदारास मुदतवाढ न देता, नवीन निवीदा प्रक्रिया राबवावी.

### होणाऱ्या बाळाला धोका होण्याची शक्यता

**आहाराचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून खासगी ठेकेदार नियुक्त केला होता. मात्र फेब्रुवारी 2023 मध्ये ठेकेदाराची मुदत संपल्याने आहाराचा पुरवठाच थांबविण्यात आला आहे. आहार मिळत नसल्यामुळे नातेवाइकांना इतर पर्यायांचा शोध घ्यावा लागत आहे. बाहेर गावच्या रुग्णांना अधिकचे पैसे खर्च करून जेवणाची सोय करावी लागत आहे. तसेच गर्भवती महिलांना योग्य संतुलित आणि सकस आहार न मिळाल्याने पर्यायाने त्यांना होणाऱ्या बाळाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली आहे.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनी भाजपातर्फे "एकत्रित योगा"

## भाजपा शहराध्यक्ष तथा आ. महेश लांडगे यांचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. यावर्षीसुद्धा भारतीय जनता पार्टीच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवडमध्ये मावळ लोकसभा मतदार संघांतर्गत 'एकत्रित योगा कार्यक्रम' घेण्यात येणार आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवडकर नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**



पिंपरी-चिंचवडमध्ये निगडी-प्राधिकरण येथील मदनलाल धिंग्रा मैदानावर दि. २१ जून २०२३ रोजी सकाळी ६ वाजता 'एकत्रित योगा कार्यक्रम' होणार आहे. यावेळी माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, माजी राज्यसभा सदस्य अमर साबळे, शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप, उमा खापरे, माजी महापौर माई ढोरे, माजी राज्यमंत्री सचीन पटवर्धन, प्रदेश निमंत्रित सदस्य शंकर जगताप, माजी जिल्हा अध्यक्ष सदाशिव खाडे, पिंपरी-चिंचवड प्रभारी वर्षा डहाळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### निगडी- प्राधिकरण अन् भोसरी येथे होणार कार्यक्रम

योग दिवस मावळ लोकसभा संयोजक राजू दुर्गे म्हणाले की, जगभरातील नागरिकांना योगाचे महत्त्व पटावे म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २१ जून हा जागतिक योगा दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आणि तो जागतिक योगा दिन म्हणून जगभरात साजरा होऊ लागला. आपल्या देशातील सर्व नागरिकांसाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. योगा हा अनेक शतकांपासून चालत आलेला पारंपरिक व्यायाम प्रकार आहे. योगामधील काही सहज प्रकार जे आपण अत्यंत सहजपणे करू शकता असे प्रकार आणि त्यापासून आपल्याला मिळणारे फायदे या कार्यक्रमातून आपल्याला समजणार आहेत.

# येत्या पावसाळ्यात पुन्हा पुणे खड्ड्यांत!

## » आरोप-प्रत्यारोपांत रखडली दुरुस्ती, 60 किलोमीटरचे रस्ते खराबच

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळा तोंडावर आला, तरी चाळण झालेल्या १०० किलोमीटरच्या लांबीच्या रस्त्यांपैकी केवळ ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दुरुस्ती पूर्ण झाली आहे. निविदा प्रक्रियेवर झालेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे या रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत. कॉंक्रिटीकरण करायचे आठ किलोमीटरचे रस्ते नजीकच्या काळात होण्याची शक्यताही कमी असल्याने यंदा पावसाळ्यात पुन्हा पुणेकरांना खड्डे चुकविण्याची कसरत करावी लागणार आहे. यंदा पावसाळ्यात पुन्हा पुणेकरांना खड्डे चुकविण्याची कसरत करावी लागणार आहे. आरोप-प्रत्यारोपांत रस्त्यांची दुरुस्ती रखडली आहे. अद्यापही ६० किलोमीटरचे रस्ते खराबच आहेत.**



उर्वरित ६० किलोमीटर रस्त्यांपैकी ४४ किलोमीटर लांबीचे रस्ते करण्यासाठी नुकतेच कार्यादेश देण्यात आले असून, जून अखेरीपर्यंत ते पूर्ण होतील, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणावर रस्त्यांची खोदाई करण्यात आली होती. समान पाणी पुरवठा योजनेंतर्गतच्या वाहिन्या, मलनिस्सारण विभाग आणि विद्युत विभागानेही खोदाई केली होती. याशिवाय, 'एमएनजीएल', व दूरसंचार कंपन्यांनीही सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदाई केली होती. त्यामुळे शहरभर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले होते. त्यामुळे प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीकाही झाली होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने १०० किलोमीटर लांबीचे रस्ते दुरुस्त करण्यासाठी पाच पॅकेजमध्ये निविदा प्रक्रिया राबविली. त्यातील दोन पॅकेजची निविदा प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली. या दोन पॅकेजनुसार ४४ किलोमीटरचे रस्ते करण्यात येणार आहेत.

### निविदांचा गोंधळ

महापालिका प्रशासनाने राबविलेल्या पॅकेज चार आणि पाचच्या निविदा प्रक्रियेबाबत आरोप-प्रत्यारोप झाल्याने प्रशासनाने दोन्हीही पॅकेजची प्रक्रिया नव्याने राबविली. पॅकेज चार आणि पाचमध्ये समाविष्ट गावांमधील रस्त्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. हांडेवाडी, कोंढवा, काळेपडळ, केशवनगर, आंबेगाव खुर्द, कात्रज, वानवडी, बावधन, भेलकेनगर, वारजे, साकोरेनगर याशिवाय शहराच्या मध्यवस्तीतील भांडारकर रस्ता, डेक्कन जिमखाना, लॉ कॉलेज रस्ता, पाषाण-सूस रस्ता आदी रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची किरकोळ डागडुजीची कामे प्रलंबित आहेत.

### रस्त्यांची परिस्थिती काय?

शहरातील रस्त्यांची एकूण लांबी
१४०० किलोमीटर

१२ मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंद रस्ते
४२८ किलोमीटर

१२ मीटरपेक्षा कमी रुंदीचे रस्ते
९७१ किलोमीटर

मान्सूनपूर्व डागडुजी करण्यासाठीचे रस्त्यांचे क्षेत्रफळ
५.४० लाख चौरस मीटर

मान्सूननंतर डागडुजी करण्यासाठीचे रस्त्यांचे क्षेत्रफळ
७.०० लाख चौरस मीटर

डागडुजीसाठी १२ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे क्षेत्रफळ
पाच ते सहा लाख चौरस मीटर

डागडुजीसाठी एकूण रस्त्यांचे रुंदीचे क्षेत्रफळ
१२ ते १३ लाख चौरस मीटर

रस्त्यांच्या डागडुजीसाठीचा संभाव्य खर्च
~ ३५० कोटी रुपये.

### पूर्ण झालेले रस्ते

» कमिन्स कॉलेज ते कर्वे रस्ता, कर्वेनगर परिसर, सहवास सोसायटी, पटवर्धन बाग रस्ता, जी. ए. कुलकर्णी रस्ता, के. ५२ ते शारदा निकेतन, कर्वे रस्ता, पौड फाटा चौक, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, नेहरू रस्ता, शास्त्री रस्ता, लुल्लानगर चौक ते ज्योती हॉटेल चौक, कोंढवा रस्ता, खडी मशीन चौक, सेनापती बापट रस्ता ते घोले रस्ता

### अपूर्ण रस्ते

» सिंहगड रस्ता दुरुस्ती, हडपसर मगरपट्टा ते मुंढवा चौक
रामबाग कॉलनी-मोरे विद्यालय ते गिरीजा सोसायटी
सेंट्रल बिल्डिंग ते साधु वासवानी चौक, शिवाजी रस्ता
खडी मशिन चौक ते साई सर्व्हिस, आंबेगाव बुद्रुक-सिंहगड कॉलेज रस्ता, सहकारनगर- गोळवलकर गुरूजी रस्ता

" रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पाच पॅकेजनुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मध्यवर्ती शहरातील बहुतांश रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. पॅकेज चारनुसार करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे कार्यदिश देण्यात आले आहेत, तर पॅकेज पाचमधील निविदांची मान्यता अंतिम टप्प्यात आहे. जून अखेरीपर्यंत बहुतांश रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात येतील. - **व्ही. जी. कुलकर्णी,** मुख्य अभियंता, पथ विभाग

---

# राजगडच्या पायथ्याशी सडलेल्या अवस्थेत MPSCच्या तरुणीचा मृतदेह

## » पुण्यात एक धक्कादायक घटना: गेल्या काही दिवसांपासून होती बेपत्ता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किल्ले राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी आज सकाळच्या सुमारास एका तरुणीचा मृतदेह सापडल्याची माहिती समोर आली आहे. हा मृतदेह सडलेल्या अवस्थेत आढळला असून त्याची ओळख पटवणे अवघड जात होते. मोठ्या घातपाताची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे.**

दर्शना दत्तू पवार, असे मृत झालेल्या तरुणीचे नाव असून तिने नुकतीच एमपीएससीची परीक्षा पास झाली असल्याची माहिती समोर आली आहे. तिची वन परिक्षेत्र अधिकारीपदी निवड झाली होती. ती हरवल्याची तक्रार १५ जून रोजी नऱ्हे आणि सिंहगड रोड पोलिस स्टेशनमध्ये देण्यात आली होती. मात्र, आज सकाळी राजगडच्या पायथ्याशी तिचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

वेल्हे तालुक्यात असणाऱ्या राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या सतीचा माळ या परिसरात हा मृतदेह सापडला आहे. साधारण आठ दिवसांपूर्वी हा खून झाला असल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे. सापडलेला मृतदेह सडलेल्या अवस्थेत असून मृतदेहाच्या जवळ काही वस्तू सापडल्या असून त्यावरून तरुणीची ओळख पटल्याची माहिती समोर आली आहे.



घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेहाची आणखी ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. संबधित तरुणी ही पुण्यात एमपीएससी करत होती. ती परीक्षा ती पासही झाली होती. मात्र, आठ दिवसानंतर अचानक मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत मुलीचे वडील दत्ता दिनकर पवार यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मुलगी दर्शना ही सत्कार घेण्यासाठी ९ जून रोजी पुण्यातील स्पॉट लाईट अ‍ॅकॅडमी येथे आली होती. ११ जून सायंकाळी चार वाजेपर्यंत ती आमच्या संपर्कात होती. मात्र, १२ जून रोजी दर्शनाला आम्ही दिवसभर फोन करत होतो. मात्र, तिने फोन उचलले नाही.

### सिंहगड रोड पोलिसात मिसिंगची तक्रार

» **दर्शना ही त्याचा मित्र राहुल दत्तात्रय हांडोरे हिच्यासोबत सिंहगड आणि राजगड याठिकाणी फिरण्यासाठी गेली आहे. हे दोघेही संपर्कात नाहीत आणि माघारी देखील आलेले नाहीत. म्हणून त्यांनी सिंहगड रोड पोलिसात मिसिंगची तक्रार दिली.**

# करदात्यांच्या मालमत्ताकराबाबत शंका, प्रश्न व अडचणींचा ‘ऑन द स्पॉट’ निपटारा!

## करसंवादास करदात्यांचा ‘ऑनलाइन’ व ‘ऑफलाइन’ उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**करदात्यांच्या मालमत्ताकराबाबत शंका, प्रश्न व अडचणींचा निपटारा करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांशी ‘करसंवाद’ सुरू केला. महिन्याच्या (PIMPRI) प्रत्येक चौथ्या शनिवारी होणारा करसंवाद शनिवारी (दि. 17) पार पडला. करदात्यांना जूनअखेरच्या सवलतींची माहिती मिळण्यासाठी आयोजित केलेल्या करसंवादास करदात्यांनी ‘ऑनलाइन’ व ‘ऑफलाइन’ पद्धतीने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी विभागाचे अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.**



### 30 जूनपूर्वीच कर सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन

**»सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख म्हणाले, “गतवर्षी महानगरपालिकेने 826 कोटींच्या वसुलीचा टप्पा पार केला. विभागातील कर्मचारी व शहरातील जागरूक नागरिक यांच्यामुळेच हा टप्पा आम्ही गाठू आणि पार करू शकलो.**

**»त्यामुळे 816 कोटींचा उच्चांक हे करदात्यांचे यश आहे. त्यामुळे चालू वर्षीही ज्या नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेतला नाही, त्यांनी 30 जूनपूर्वीच या सवलतींचा लाभ घ्यावा.”**

नागरिक आणि अधिकारी यांच्यातील थेटसंवादामार्फत ‘अडचणींचा निपटारा’ असा उद्देश असलेल्या करसंवादाने, नागरिकांना प्रश्न विचारण्यासाठी दिलेली संधीचा आजपर्यंत शेकडो नागरिकांनी लाभ घेतला आहे. करदात्यांचे प्रश्न ऐकून त्यावर तातडीचा निपटारा, निरसन करून त्याबाबत अधिकाऱ्यांना आदेश देऊन नागरिकांचा विभागाबाबत विश्वास निर्माण करण्याचे काम ‘करसंवाद’ उपक्रमाने केले आहे. शनिवारी पार पडलेल्या करसंवादमध्ये 40 पेक्षा जास्त नागरिकांनी ऑनलाइन व 30 पेक्षा जास्त नागरिकांनी विभागामध्ये येऊन विचारलेल्या प्रश्नाचे करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी निरसन केले.

उपयोगकर्ता शुल्क कशासाठी? अवैध बांधकाम शास्ती समायोजन कधीपासून? सामान्य करातील सवलती कोणाला व किती? विलंब शुल्क कधी पासून? अशा अनेक प्रश्नांचे निरसन करण्यात आले. त्याचबरोबर नागरिकांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेऊन त्याबाबत अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.

‘ऑनलाइन’ माध्यमातून सहभागी झालेल्या प्रत्येक प्रश्नास देशमुख यांनी उत्तर देताना, सामान्य करात आगाऊ भरणा केल्यास 5 टक्के, ‘ऑनलाइन’ कराचा भरणा केल्यास 5 टक्के, महिलांच्या नावे असणाऱ्या एका निवासी मालमत्तेस 30 टक्के, दिव्यांग 50 टक्के, माजी सैनिकांना 100 टक्के, एसटीपी व ऑनसाईट कम्पोस्टिंग यंत्रणा 5 टक्के व झिरो वेस्ट व एसटीपी प्लांटसाठी 10 टक्के अशा सवलती असून, जूनअखेर मालमत्ताकराचा भरणा करण्याचे आवाहनही केले.

‘उपयोगकर्ता शुल्क’ हे नागरिकांची पिळवणूक नसून, सरकारच्या आदेशानुसार नागरिकांना कचरा संकलन व विलगीकरण यासाठी मिळणाऱ्या सेवेसाठीचे शुल्क असल्याचे देशमुख यांनी सांगितले. महानगरपालिकेचा विकासकामातील खर्च आणि उपयोगकर्ता शुल्कातून मिळणारे उत्पन्न यामध्ये मोठी तफावत आणि नागरिकांना सेवा देण्याचे शुल्क असल्याचे सांगत, त्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला.

जूनअखेर मालमत्ताकराचा भरणा न केल्यास येत्या काळात विभागाच्या जप्ती मोहिमेला थकबाकीदारांना सामोरे जाण्याचेही यावेळी सूचित केले. त्याचबरोबर थकबाकीदारांना येत्या काळात प्रतिमाह दोन टक्क्यांचे विलंब शुल्क आकारण्यात येणार असल्याचेही सांगितले. महापालिका मालमत्ताकराबाबत सवलतींचे आवाहन करण्यासाठी होर्डिंग्ज, पाम्लेट, रील्स स्पर्धा, सोशल मीडिया, रेडिओ जिंगल्स, रिक्षावरील आवाहनातून जनजागृती करीत आहे. या विविध माध्यमांतून मालमत्ताकराच्या सवलती व कराबाबत आदी सूचना देण्यात येत असून, नागरिकांनी जूनपूर्वीच मालमत्ताकराचा भरणा करावा, असे आवाहन देशमुख यांनी केले.

---

# भाजपातर्फे ‘सोशल मीडिया इंफ्ल्युएसंर संमेलन’ उत्साहात

## मोदी @9 महा-जनसंपर्क अभियानाची प्रभावी अंमलबजावणी; मावळ लोकसभा संयोजक बाळा भेगडे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदार संघांतर्गत भारतीय जनता पार्टीच्या ‘सोशल मीडिया इंफ्ल्युएसंर संमेलन’ यशस्वीपणे पार पडले. मतदार संघात मोदी @9 महा-जनसंपर्क अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे, अशी माहिती अभियानाचे मावळ लोकसभा संयोजक बाळा भेगडे यांनी दिली. भारताते कर्तृत्ववान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला ९ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त मोदी सरकारचे ऐतेहासिक निर्णय, विकासकामे व जनहितार्थच्या योजना यांची माहिती जनतेपर्यंत पोहचावी, याकरिता देशभरातील सर्व लोकसभा मतदारसंघांमधे महा-जनसंपर्क अभियान व मोदी@9 चे कार्यक्रम सुरू आहेत.**



याच अभियानाचा एक भाग मावळ लोकसभा मतदारसंघातील सोशल मीडियावरील प्रभावशाली व्यक्तींचे ‘सोशल मीडिया इंफ्ल्युएसंर संमेलन’ पिंपळे सौदागर येथील प्रसिद्ध ‘हॉटेल गोविंद गार्डनच्या बँक्वेट हॉल’ मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

राज्याचे माजी मंत्री व मोदी@9 चे मावळ लोकसभेचे संयोजक बाळा भेगडे यांनी उपस्थित ‘सोशल मेडिया इंफ्ल्युएसंर’ ना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस ॲड.मोरेश्वर शेडगे, सोशल मेडिया इंफ्ल्युएसंर संमेलनाचे मावळ लोकसभेचे संयोजक शत्रुघ्न काटे, पिंपरी विधानसभा संयोजक राजेश आण्णा पिल्ले, मावळ विधानसभा संयोजक सागर शिंदे, चिंचवड विधानसभा संयोजक अमेय देशपांडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य चंद्रकांत आण्णा नखाते, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, माजी नगरसेविका उषा मुंढे, अश्विनी चिंचवडे, आरती चौंधे, शारदा सोनावणे, निर्मला कुटे, माजी नगरसेवक संदिप आण्णा कस्पटे, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, बाबा त्रिभुवन, तानाजी बारणे यासंह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व मावळ लोकसभेतील ‘सोशल मेडिया इंफ्ल्युएसंर’ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी पीयुष पाटील, कुणाल मोरे व प्रणय राज गोस्वामी या सोशल मेडिया इंफ्ल्युएसंरनी उपस्थितांशी सोशल मिडियाचा वापर कसा केला पाहिजे याची माहिती दिली व आपले अनुभव सांगीतले. मावळ लोकसभेचे संयोजक शत्रुघ्न बापू काटे यांनी प्रास्ताविक व मोदी@9 चे जिल्हा सहसंयोजक ॲड.मोरेश्वर शेडगे यांनी सूत्रसंचालन, तर चिंचवड विधानसभा संयोजक अमेय देशपांडे यांनी आभार मानले.




# काना-मनाची सफाई करा!

**महाराष्ट्रातील जनतेची मनसोक्त करमणूक करण्याचा जो विडा राज्यातील नेत्यांनी उचलला आहे; त्याचेच पालन कसोशीने चालू आहे. 'धनुष्यबाण' हे चिन्ह आणि 'शिवसेना' हे नाव या दोन्ही ओरिजिनल बाबी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाकडे आल्या आहेत. त्यामुळे, त्यांच्यातही मूळ शिवसेनेचा संचार होऊन भाजपला अधूनमधून झटके देऊन किंमत दाखवून द्यायची; अशी भावना बळावली की काय, हे समजत नाही.**

तसे नसते तर कुठल्यातरी पाहणीचा संदर्भ देऊन आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची सरळच तुलना करून उपमुख्यमंत्री कमी लोकप्रिय असल्याची दवंडी शिंदेसेनेने पिटली नसती. पुरेसे नुकसान करून झाल्यावर आणि धक्का देऊन झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी सारवासारव करणारी मोंदीसमवेत फडणवीस यांचेही छायाचित्र असणारी जाहिरात आली.



नव्या सरकारला एक वर्ष होते आहे. अजून विस्तार झालेला नाही. जागोजागी शाब्दिक चकमकी होत आहेत. ठाणे जिल्हा आणि नाशिक ही त्याची लक्षात येणारी उदाहरणे. अशावेळी, पंतप्रधानांचे छायाचित्र असणारी पूर्ण पानभर जाहिरात नकळत छापली जाते आणि तिची जबाबदार नेत्यांना कल्पनाच नसते; यावर 'शेंबडे मूल'ही विश्वास ठेवणार नाही. पहिली जाहिरात कुणी दिली हे माहीत नसूनही दुसऱ्या जाहिरातीत पहिल्याच आकड्यांच्या बेरजा मात्र बरोबर जमल्या आहेत! नव्या जाहिरातीत शिंदे व फडणवीस यांना ४९.३ टक्के जनतेचा आशीर्वाद तर पहिल्या जाहिरातीत २६.१ टक्के पाठिंबा मिळविणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी २३.२ टक्के पाठिंबा मिळविणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांना मागे टाकले. मुळात मित्रपक्षांचे सरकार असते; तेव्हा कोणत्याही कथित पाहणीतील निष्कर्ष कसे मांडू नयेत, याचे पहिली जाहिरात हे उत्तम उदाहरण होते. मात्र, प्रश्न केवळ टक्केवारीचा नाही. पहिल्या जाहिरातीत, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जोडीने महाराष्ट्रात केलेल्या लोककल्याणकारी प्रकल्पांमुळे त्यांना अव्वल स्थान मिळाले आहे..' असे म्हटले आहे. हा उपमुख्यमंत्री आणि युतीतील मोठा पक्ष असणाऱ्या भाजपचे विधिमंडळ नेते देवेंद्र फडणवीस यांना अपमान वाटला तर त्यात चूक नाही. कोल्हापूरमधील कार्यक्रमाला अनुपस्थित राहून त्यांनी त्यांची नाराजी स्पष्टपणे दाखवून दिली.

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक दिवसागणिक जवळ येत असताना नवे मंत्री घेण्याऐवजी मित्रपक्षाच्या निम्म्या मंत्र्यांना कोणी घरी पाठवेल का? मात्र, अशी चर्चा घडविण्यात अनेकांचा स्वार्थ असतो. दुसरे म्हणजे, लोकसभेच्या ४८ जागांचे वाटप भाजप, शिवसेना आणि मित्रपक्षांना सामोपचाराने करावे लागेल. ठाणे व कल्याण या दोन्ही मतदारसंघांवर काही भाजप नेत्यांनी दावा सांगणे ही पुढील संघर्षाची चुणूक आहे. श्रीकांत शिंदे यांनी या दाव्याला राजीनाम्याची तयारी दाखवत संतप्त उत्तर दिले होते. तसेच, ठाणे जिल्ह्यातल्या एका पोलिस अधिकाऱ्याची बदली किंवा त्याचा भ्रष्टाचार हा प्रतिष्ठेचा मुद्दा बनावा, हे या मित्रपक्षांचा मधुचंद्राचा काळ संपल्याचे लक्षण आहे. सुधारित जाहिरात आल्यानंतरही भाजप नेत्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांकडे बेनामी आणि बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी या अधिकाऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल केली. गृहखाते भाजपकडे आहे आणि हा संबंधित अधिकारी शिंदे पितापुत्राच्या मर्जीतील आहे, असे म्हणतात. विशेष म्हणजे, या जाहिरातींनंतर पत्रकारांशी दिलखुलास गप्पा मारणाऱ्या अजित पवार यांनी 'आपणही या अधिकाऱ्याला एकदा ताकीद दिली होती आणि त्याच्याबद्दल अनेक तक्रारी आहेत..' असे म्हटले आहे. एकूणच अजित पवार यांचा सगळा खेळकर नूर फडणवीस यांना सहानुभूती दाखविणारा आणि शिंदे यांच्या शिवसेनेला चिमटे काढणारा होता. पवार यांचे हे बोलणे पुढे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

दुसऱ्या जाहिरातीत जे डबल इंजिन अवतरले आहे; ते पहिल्या जाहिरातीत मात्र 'जाहिरात कंपनी' विसरून गेलेली दिसते. त्यामुळेच, दुसरी जाहिरात येऊनही 'भाजप कार्यकर्त्यांच्या मनाला ठेच लागली आहे,' असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बानवकुळे म्हणत आहेतच. दुसरे एक भाजपचे बोलभांड खासदार थेट हत्ती आणि बेडूक कथेवर जाऊन पोहोचले. युती असताना भाजपने सर्व ४८ मतदासंघांचा आढावा का घ्यावा, असा प्रश्न काहींना पडला. तो चूक नाही. मात्र, दबावाचे राजकारण असेच असते. अर्थात, ते खेळताना जाहीर शोभा करायची किंवा करून घ्यायची नसते. दुसऱ्या जाहिरातीत 'जनतेच्या चरणी माथा..' असे म्हटले आहे. एकवेळ असा माथा ठेवला नाही तरी चालेल; फक्त एकमेकांचे पाय ओढत असताना सरकारचा कारभार सुरळीत आणि मुख्य म्हणजे स्वच्छ ठेवा, हे स्पष्ट सांगण्याची गरज आहे. या भानगडीत उपमुख्यमंत्र्यांना जी कानदुखी झाली; तिच्यामुळे उद्या मुख्यमंत्र्यांचे बोलणे ऐकू येईनासे झाले तर मोठीच आफत येईल. तेव्हा दोघांनीही कान आणि मन दोन्ही साफ करण्याची गरज आहे.

## संपादकीय »

### जननी चिडली!

***सरकारला आव्हान वा सरकारविरोधी भूमिका घेणाऱ्यांवर देशात यंत्रणा सोडता येतात, टीका परदेशांतून झाल्यास तिला 'भारतविरोधी कट' असे किती काळ म्हणणार? स्तुतिपाठक आणि विचारांध समर्थक या दोहोंच्या पलीकडील जगाची दखल सरकारने घ्यायला हवी..***

अलीकडेच अमेरिकेने भारतातील लोकशाहीबाबत स्तुतिसुमने उधळली. त्याच देशातून भारतीय लोकशाहीबाबत प्रश्न निर्माण केले गेल्यास, ते करणाऱ्यांची नियत संशयास्पद का मानावी? या लोकशाही संकल्पनेची एक पंचाईत असते. ती अर्धीमुर्धी असू शकत नाही. त्या लोकशाहीवर निष्ठा असते. अथवा नसते. दोनच कप्पे.

'काही प्रमाणात लोकशाही मानणे' किंवा 'काही प्रमाणात लोकशाही न मानणे' असे दोन्हीही प्रत्यक्षात नसते. ट्विटरचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जॅक डॉर्सी यांनी भारताविषयी केलेल्या भाष्यानंतर उठलेल्या काहुरामुळे 'लोकशाही' या संकल्पनेबाबतच्या द्वंद्वात अडकलेला भारत उठून दिसतो.

**देशातील वयोवृद्ध महिलांच्या छळात वाढ झाल्याचा निष्कर्ष 'हेल्पेज इंडिया'च्या ताज्या अहवालात काढला आहे. यातून विविध सामाजिक अर्थ निघू शकतात. गेल्या काही वर्षांत सरासरी आयुष्य वाढले आहे. ते यापुढेही वाढेल. मात्र, आपल्या देशातील सामाजिक-कौटुंबिक व्यवस्थेत अनेकदा दीर्घायुष्य हे संकट ठरते, असा याचा एक अर्थ निघतो.**

## नैराश्यातून येणारे क्रौर्य!

महिलांच्या छळाची विविध कारणे असू शकतात. या छळात पोटच्या मुलानेच केलेल्या छळाचे प्रमाण सर्वाधिक आहे. वाढत्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, महागडे शिक्षण, सुखासीन आयुष्य जगण्यात अपयश आल्याने येणारे नैराश्य यातून घरची वृद्ध स्त्री ही 'नकोशी जबाबदारी' वाटू लागते. अनेकदा त्या स्त्रीच्या किंवा तिच्या पतीच्या निवृत्तीवेतनाची रक्कम हा छळवणुकीचा मुद्दा असतो. अनेकदा सासू-सूनेच्या वादात घरातील कर्ता पुरुष विविध कारणानी पत्नीची बाजू घेतो. याचा परिपाक म्हणून अनेकदा शारीरिक छळापर्यंत मजल जाते. ज्या समाजात मातृत्वाच्या गौरवाचे ढोल बडवले जातात, मातृत्वाच्या भावनेचे उदात्तीकरण केले जाते, त्याच समाजात हे घडत आहे हे अविश्वसनीय असले तरी भारतीय समाजाच्या दांभिक वृत्तीला ते साजेसे आहे. 'पोटच्या पोराची' किंवा सुनेची तक्रार केली तर डोक्यावरचे छप्पर आणि रोजचे दोन घास यांचीही भ्रांत होईल की काय म्हणून बहुतांश स्त्रिया तोंड उघडत नाहीत. वृद्धाश्रमांना आपल्याकडे अजून प्रतिष्ठा नाही. 'कुटुंबाची बदनामी होईल', म्हणून वृद्धाश्रमाचा विचार टाळला जातो.



वृद्धाश्रमांची अवस्था हाही एक पैलू आहे. चांगली व्यवस्था असते तिथले शुल्क अनेकदा वृद्धांना परवडणारे नसते. एका विशिष्ट विचारसरणीच्या लोकांना मुलींच्या शिक्षणाचा खर्च नाहक वाटतो. छुप्या गर्भलिंगचाचणीचा मार्ग स्वीकारणारेही याच वैचारिक पठडीतले. या वृत्तीच्या लोकांना घरातील वृद्ध स्त्री ही अडगळ वाटते आणि त्यातही अशा स्त्रीवरील वैद्यकीय खर्चाकडेही नाहक म्हणून पाहिले जाते. वैद्यकीय उपचार किंवा सुविधा न देणे हे शारीरिक छळातच गृहित धरले तर हे प्रमाण पाहणीत सांगितल्याहून अधिक असेल. आर्थिक प्रगतीचे टोक गाठणारा १५ ते २० टक्के वर्ग, कसेबसे सगळे जमवणारा ४० टक्के वर्ग आणि संसाराची दोन टोके जुळविताना मेटाकुटीला येणारा उर्वरित वर्ग अशी सध्याची अवस्था आहे. नैराश्यातून येणारे क्रौर्य हे नेहमीच अधिक दाहक आणि अविचारी असते हेच या पाहणीतून लक्षात येते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुवत, मर्यादा ओळखून बोला!

## » एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना सुनावले

।ठाणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे जगभरात देशाचा गौरव होत आहे. त्यांच्यावर टीका करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे. देशातील आणि राज्यातील जनता याचे उत्तर तुम्हाला लवकरच देईल, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सुनावले. आपली कुवत आणि मर्यादा ओळखून बोला, असा टोलाही शिंदे यांनी लगावला.**



> “ जंगलाचा राजा वाघच असतो. काहींना रोज कोल्हेकुई करायची सवय जडली आहे. वाघ अशांकडे दुर्लक्ष करतो. पंतप्रधानदेखील तुमच्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र ज्यादिवशी त्यांची नजर तुमच्यावर पडेल तेव्हा तुम्ही दिसणारदेखील नाहीत.
>
> – **एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या विधान परिषदेतील आमदार मनीषा कायंदे यांच्यासह काही नगरसेवकांनी रविवारी रात्री उशीरा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरेंनी आपल्या पक्षाच्या मेळाव्यात पंतप्रधानांवर केलेल्या टीकेला शिंदे यांनी उत्तर दिले. ‘शिवसेनेचा वर्धापन दिन उद्या असतो. मात्र नवा दिवस शोधून काढत आजच भाषणातून तीच-तीच कॅसेट पुन्हा वाजवली. या बोलण्याची आता लोकांनाही सवय झाली आहे. मात्र बोलताना स्वत:ची कुवत आणि मर्यादा ओळखून बोलायला हवे. आम्ही बाळासाहेबांच्या विचारांसोबत आणि शिवसेनाप्रमुखांचे स्वप्न ज्यांनी साकार केले त्यांच्यासोबत आहोत. ज्यांना बाळासाहेबांनी विरोध केला त्यांच्यासोबत तुम्ही सत्तेसाठी लाचारी केली. काम झाले की फेका ही तुमची वृत्ती आहे’, अशी टीकाही शिंदे यांनी केली.

जे गेले ते कचरा होता असे म्हणता, पण कचऱ्यापासून उर्जा निर्मीती तर होतेच. शेतकरी खत निर्मीती देखील करतो. कचरा आता टाकावू राहीलेला नाही, या शब्दात मुख्यमंत्र्यांनी ठाकरे यांना लक्ष्य केले.

---

## कुठे मेघगर्जनेसह पाऊस, तर कुठे उष्णतेच्या लाटेचा इशारा

।मुंबई । महाईन्यूज



मान्सूनची अरबी समुद्रातील शाखा रविवारीही पुढे सरकली नाही. पश्चिम बंगाल, बिहार, दक्षिण द्वीपकल्पाचा आणखी काही भाग येथे मान्सून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये प्रगती करू शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. मात्र रेंगाळलेल्या पावसाने तापमान दिलासा हरवला आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यात विदर्भासाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. तर, देशात ओडिशा, बिहार, झारखंड, छत्तीसगड, पूर्व उत्तर प्रदेश येथे कमाल तापमानाचा पारा ४२ ते ४४ अंशांदरम्यान असू शकेल, असे स्पष्ट केले आहे. यामुळे पावसाची प्रतीक्षा आणखी तीव्र झाली आहे.

पावसाअभावी केवळ विदर्भातच नव्हे, तर पूर्ण राज्यातच सरासरीपेक्षा अधिक तापमान नोंदले जात आहे. राज्यात पाऊस दाखल झाल्यापासून १८ जूनपर्यंत कोकणातला मान्सूनचा प्रवास अजूनही पुढे सरकलेला नाही. मध्य महाराष्ट्रात १२ जून रोजी किंचित प्रगती झाल्यानंतर मान्सूनचा प्रवास तिथेच अडकला आहे. कोकण विभागात सरासरीपेक्षा दीड ते साडेतीन अंशांनी कमाल तापमान चढे आहे. हर्णे येथे रविवारी ३.८, तर रत्नागिरी येथे २.९ अंशांनी कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक होते. मुंबईत कुलाबा येथे शनिवारपेक्षा १.२ अंशांनी कमाल तापमान वाढले असून रविवारी ३४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा २.५ अंशांनी अधिक होते. सांताक्रूझ येथे ३३.६ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले असून हे तापमान सरासरीपेक्षा १.७ अंशांनी अधिक होते.

मध्य महाराष्ट्रात सांगली, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांमध्येही सरासरीपेक्षा कमाल तापमानात चार अंशांहून अधिक वाढ नोंदली गेली.

### हलक्या सरींचीच शक्यता

»रविवारी दुपारी जाहीर केलेल्या पाच दिवसांच्या जिल्हा पातळीवरील पूर्वानुमानानुसार कोकण विभागात गुरुवारपर्यंत पावसाचा वेग वाढण्याची शक्यता नाही. पालघर, ठाणे, मुंबई येथे २२ जूनपर्यंत हलक्या सरींचाच अंदाज आहे. तर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात मध्यम सरींची शक्यता आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव येथे कोरड्या वातावरणाचीही शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोमवार, मंगळवारी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी येत्या तीन-चार दिवसांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

---

## वेली वटवृक्षाचे वाकडे करु शकत नाहीत

### » उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंना टोला

। अकोला ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्री'कितीही वेली एकत्र आल्या तरी त्यांना वटवृक्ष होता येत नाही. वेली वटवृक्षाचे वाकडे करू शकत नाही. हा वटवृक्ष म्हणजे नरेंद्र मोदी आहेत', असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी व्यक्त केला. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हटविण्यासाठी देशभरातील वेगवेगळे पक्ष युती करीत आहेत. पाटण्यात ते एकत्र येणार आहेत. हातात हात घालून, हात वर करून 'मोदी हटाव'चा नारा देतील. २०१९मध्येही त्यांनी हेच केले.**

कोलकात्यात एकत्र आले. मंचावर ५२ नेते बसले होते. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर काँग्रेसचे केवळ ४८ खासदार निवडून आले. मंचावर बसलेल्या नेत्यांपैकी खासदार त्यांना निवडून आणता आले नाही. या नेत्यांमध्ये आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांची भर पडणार आहे. कितीही वेली एकत्र आल्या तरी त्यांना वटवृक्ष होता येत नाही. वेली वटवृक्षाचे वाकडे करू शकत नाही. हा वटवृक्ष म्हणजे नरेंद्र मोदी आहेत', असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी व्यक्त केला.

मोदी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त रविवारी अकोला क्रिकेट क्लबच्या मैदानावर सेवा सुशासन, लोक जनकल्याण, महाजनसंपर्क कार्यक्रमांतर्गत जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. 'उद्धव ठाकरे यांची अवस्था सहन होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी आहे. मागच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून, खुर्चीच्या मोहाने महाविकास आघाडीत गेले. त्याचवेळी विधानसभेत भाषण करताना मी परत येणार असे सांगितले होते. केवळ मीच नाही तर एकनाथ शिंदे यांना सोबत घेऊन आलो. उद्धव हे मात्र अजूनही भाषणेच करीत आहेत. ४० आमदार त्यांच्या नाकाखालून निघून जातात आणि त्यांना समजतही नाही. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत जाण्याची वेळ येईल, तेव्हा शिवसेनेचे दुकानच बंद करणार असे म्हणाले होते', अशी आठवण त्यांनी सांगितली.



### 'औरंगजेबाचे महिमामंडन करणे कितपत योग्य?'

**»'आज राज्यात अचानक औरंगजेबाचे स्टेटस ठेवणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. त्यांना महाराष्ट्राचा विकास नको आहे. म्हणूनच त्यांच्याकडून अशांतता पसरविली जात आहे. ॲड. बाळासाहेब आंबेडकरही औरंगजेबाच्या कबरीवर गेले. बाळासाहेबांना पाहताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आठवण होते. हैदराबादच्या निजामाने बाबासाहेबांनाही आमीष दिले होते. पण, त्यांनी भारतभूमीत तयार झालेला बुद्ध धम्म स्वीकारला. औरंगजेब आमचा नेता, राजा कसा होऊ शकतो', असा प्रश्न फडणवीस यांनी केला. 'छत्रपती शिवाजी महाराज हेच आपले राजे आहेत. भारतातील मुसलमान हे औरंगजेबाचे वंशज नाहीत. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित मुसलमान औरंगजेबाला मान्यता देत नाही. तरीही बाळासाहेबांनी औरंगजेबाच्या कबरीवर जाऊन महिमामंडन करणे कितपत योग्य आहे? ॲड. आंबेडकर यांच्यासोबत युती करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना हे मान्य आहे काय', असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.**

### 'ठाकरेंचे स्क्रिप्ट रायटर उधारीवर'

'उद्धव ठाकरे यांना कुणाची भीती वाटायला लागली की मुंबईपासून महाराष्ट्र तोडायला निघाले, अशी टीका करतात. आज त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मुंबईला महाराष्ट्रापासून तोडणार असल्याचे सांगितले. मुळात कुणीही आला तरी महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी होऊ शकणार नाही. त्यामुळे ही डायलॉगबाजी बंद करा', असा टोलाही फडणवीस यांनी लगावला. ठाकरे यांचे भाषण लिहिणारे स्क्रिप्ट रायटर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेले. उधारीवर काँग्रेस, राष्ट्रवादीतून स्क्रिप्ट रायटर आणले आहेत. घरात बसून राजकारण करणाऱ्यांना मोदी, शहा काय कळणार, असा प्रश्नही त्यांनी केला.

# 'बायको असावी तर रविनासारखी!'



बॉलीवूड अभिनेत्री रविना टंडन ही सोशल मीडियावर नेहमीच वेगवेगळ्या कारणासाठी चर्चेत असणारी अभिनेत्री आहे. रविनाला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ या अभिनेत्रीनं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. आता तिच्या एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधले गेले आहे. रविनाला लाईमलाईटमध्ये राहणं आवडतं. त्यामुळेच की काय ती वेगवेगळ्या प्रकारे मीम्स व्हायरल करुन चाहत्यांना आकर्षित केलं आहे. आता तिचा एक व्हिडिओ नेटकऱ्यांना कमालीचा भावला आहे. त्यामध्ये ती म्हणते, आता नवऱ्याचे काही खरं नाही. तो कुठे गेला, कुणासोबत गेला हे सारं माहिती आहे. मी आता त्याला फोन लावते. रविनाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

तो व्हिडिओ पाहिल्यानंतर नेटकऱ्यांना हसू आवरलेलं नाही. त्यांनी रविनाचा तो व्हिडिओ पाहून त्यावर भन्नाट प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकानं लिहिलं आहे की, बायको असावी तर अशी, नवऱ्याला जर एखादी पत्नी एवढ्या धाकात ठेवत असेल तर मग सगळ्यांना अशीच बायको मिळायला पाहिजे. असे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. काही दिवसांपासून रविना फनी व्हिडिओ शेयर करत आहे.

रविनानं वयाची पन्नाशी पार केल्यानंतर देखील तिच्या सौंदर्यावर चाहते लट्टू आहेत. तिच्या फोटोंना मिळणाऱ्या प्रतिक्रियाही चर्चेचा विषय होताना दिसत आहे. त्या व्हिडिओला मिळालेला प्रतिसादही मोठा आहे. आतापर्यंत हजारो व्ह्युज त्याला मिळाले आहेत.

# 'मुंबईमध्ये गाडी चालवणे त्रासदायक'

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री सोनम कपूर ही सध्या चित्रपटसृष्टीपासून दूर आहे. सोनम आणि तिचा पती आनंद अहूजा यांना काही महिन्यांपूर्वी पूत्ररत्न प्राप्त झाले. त्यानंतर सोनमनं बॉलिवूडमधून ब्रेक घेतला. सध्या सोनम ही तिनं केलेल्या ट्वीटमुळे चर्चेत आहे. सोनमनं मुंबईमधील (MUMBAI) ट्रॅफिकबाबत एक ट्वीट केलं. या ट्वीटनं अनेकांचे लक्ष वेधले. काही नेटकऱ्यांनी सोनमच्या या ट्वीटला रिप्लाय देऊन तिला ट्रोल केलं आहे.

## सोनमचं ट्वीट

सोनमनं ट्वीटमध्ये लिहिलं, 'मुंबईमध्ये गाडी चालवणे त्रासदायक आहे. जुहूपासून बँडस्टँडला पोहोचायला मला एक तास लागला. सर्वत्र खूप बांधकाम आणि खोदकाम, प्रदूषण होते. हे काय चालू आहे?' तिच्या या ट्वीटला 19 हजारपेक्षा जास्त नेटकऱ्यांनी लाइक केलं आहे. तर अनेकांनी या ट्वीटला कमेंट्स केल्या आहेत.

## नेटकऱ्यांच्या कमेंट्स

सोनमच्या ट्वीटला एका नेटकऱ्यानं कमेंट केली, 'दिल्लीचे लोक मुंबईमध्ये प्रदूषणाबाबत बोलत आहेत.' तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, 'पापा की परी हो उड के चली जाओ' अनेक नेटकऱ्यांनी सोनमच्या या ट्वीटला कमेंट करुन तिला ट्रोल केलं आहे. 2020 मध्ये सोनमचा 'एके वर्सेज एके' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. आता लवकरच ती ब्लाइंड या चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटामध्ये सोनमसोबत अभिनेता पूरब कोहली आणि विनय पाठक हे देखील प्रमुख भूमिका साकारणार आहेत.



# मल्याळी इंडस्ट्रीवर शोककळा, अभिनेते पूजापुरा रवी यांचं निधन

मुंबई: मल्याळी फिल्म इंडस्ट्रीतले ज्येष्ठ अभिनेते पूजापुरा रवी यांचं आज निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. अभिनेत्याच्या निधानाने चाहत्यांना धक्का बसला आहे. तर सिनेसृष्टीवरही शोककळा पसरली आहे. अनेक कलाकरांनी पूजापुरा यांच्या निधनावर दु:ख झालं आहे.

गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात पूजापुरा हे तिरुवनंतपुरमहून इडुक्कीतल्या घरी स्थायिक झाले होते. काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती बरी नव्हती. वृद्धापकाळानं त्यांचं निधन झालं. पूजापुरा यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

पूजापुरा रवी यांनी ८०० पेक्षा जास्त चित्रटात काम केलं होतं. 'गप्पी' हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता. या चित्रपटात लोकप्रिय अभिनेता टोविनो थॉमस हा मुख्य भूमिकेत होते.पूजापुरा यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात दिवंगत एन.के. आचार्य यांच्या कलानिलयम या नाटक कंपनीतून केली होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी अभिनेते कोचू प्रेमन यांनीही जगाचा निरोप घेतला. त्यांनी १९७९ साली मल्याळी चित्रपटांमध्ये पदार्पण केलं होतं. 'एढू निरंगल' या सिनेमातून त्यांनी सिनेविश्वात पदार्पण केलं होतं. मात्र ९० च्या दशकामध्ये त्यांना मल्याळी सिनेविश्वात विशेष ओळख मिळाली होती. त्यानंतर त्यांनी मागं वळून पाहिले नाही. प्रेमन हे मल्याळम सिनेमातील विनोदी भूमिकांसाठी ओळखले



जातात. त्यांनी गेल्या दोन दशकांमध्ये मल्याळी सिनेमात विशेष काम केलं आहे. मालिकांमधीलही त्यांच्या भूमिका लोकप्रिय ठरल्या. ते त्यांच्या तिरुअनंतपुरम उच्चारणासाठी प्रसिद्ध होते.

# सिद्धार्थच्या अफेअरची लिस्ट भली मोठी!



बॉलीवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राने स्वत:चा मेहनतीने बॉलीवूडमध्ये ठसा उमटवला आहे. सिद्धार्थच्या अभिनयाचेच नाही तर लोक त्याच्या लूकचेही चाहते कमी नाही. आज 16 जानेवारीला सिद्धार्थ त्याचा 38 वा वाढदिवस साजरा करत आहे. बॉलिवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा त्याच्या लव्ह लाईफमुळे देखील नेहमीच चर्चेत असतो. सिद्धार्थच्या लिंक अपच्या बातम्या त्याच्या चित्रपटांच्या नायिकांसोबत आल्या आहेत. त्याचं बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्रींसोबत नावे जोडली गेली. 2012 मध्ये करण जोहरच्या स्टुडंट ऑफ द इयरमधून बॉलिवूडमध्ये सिद्धार्थ आणि आलिया भट्टने एकत्र पदार्पण केले. तेव्हा पासून या दोघांच्या रिलेशनशिपच्या चर्चा होऊ लागल्या. त्यांची जोडी नेहमीच चर्चेत राहिली. जरी दोघांनीही त्यांच्या नात्याबद्दल कधीच उघडपणे बोलले नाहीत. 2017 मध्ये त्यांच्या ब्रेकअपची बातमी आली आणि दोघेही त्यांच्या आयुष्यात पुढे गेले.

# भारतीय अंपायरनेच केली टीम इंडियाच्या खेळाडूंची पोलखोल!

## टीम इंडिया अंपायर्सवर दबाव निर्माण करतात

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील सलग दुसऱ्या मोठ्या पराभवानंतर भारतीय संघ सध्या विश्रांती करत आहे. जून महिन्यात भारतीय संघ संपून विश्रांतीवर असेल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया पुढील महिन्यात म्हणजे जुलैमध्ये वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर जाणार आहे. जिथे भारत २ कसोटी, ३ वनडे आणि ५ टी-२० सामने खेळणार आहे. पण तत्पूर्वी भारतीय संघावर भारतातील अंपायर नितीन मेनन यांनी मोठा आरोप केला आहे.**



टीम इंडिया अपील करण्यात कुठलीही कसर सोडत नाही, हे सगळ्यांनाच माहीत आहे. सिराजपासून विराट कोहलीपर्यंत सगळेच जोरदार अपील करतात, त्यामुळे कुठेतरी पंचांवर दबाव येतो. अशा परिस्थितीत आता भारताच्या पंचांनी टीम इंडियाच्या खेळाडूंबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

### नितीन मेनन यांचा भारतीय खेळाडूंवर आरोप

भारतीय पंच नितीन मेनन हे गेल्या काही वर्षांत आपल्या उत्कृष्ट अंपायरिंगमुळे प्रसिद्धीच्या झोतात आले आहेत. ते आयसीसी एलिट पॅनेलचा भाग आहेत. इतकंच नाही तर ते ऍशेसमध्येही कामगिरी बजावणार आहे. मात्र, मेनन यांनी असे विधान केल्याने खळबळ उडाली आहे. टीम इंडियाचे स्टार खेळाडू आपल्यावर निर्णयासाठी दबाव टाकतात, असा खुलासा त्यांनी केला आहे.

नितीन मेनन पीटीआयला म्हणाले, 'टीम इंडिया जेव्हा भारतात खेळते तेव्हा खूप हाईप होते, भारतीय संघातील अनेक मोठे खेळाडू नेहमीच आमच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात, ते ५०-५० निर्णय त्यांच्या बाजूने घेण्याचा प्रयत्न करतात. पण जर त्या दबावाच्या परिस्थितीत आम्ही नियंत्रणात आहोत, तर ते काय करण्याचा प्रयत्न करत आहेत याकडे आम्ही लक्ष देत नाही. नितीन मेनन हे मूळचे मध्य प्रदेशचे आहेत आणि त्यांनी जून २०२० पासून १५ कसोटी, २४ एकदिवसीय आणि २० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अंपायरिंग केले आहे.

### नितीन मेनन ॲशेसमध्ये अंपायरिंग करणार

जून २०२० मध्ये ICC एलिट पॅनेलमध्ये समाविष्ट झालेले नितीन मेनन कोरोनामुळे परदेशात जाऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत, ते भारताच्या बहुतेक देशांतर्गत सामन्यांमध्ये अंपायरिंग करताना दिसला, त्यांनी संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि ऑस्ट्रेलियामध्ये टी२० विश्वचषक सामन्यांमध्ये देखील अंपायरिंग केले आणि गेल्या वर्षी इंग्लंडमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या होम सीरिजमध्ये अंपायरिंग करताना दिसले. जून २०२० पासून १५ कसोटी, २४ एकदिवसीय आणि २० टी२० सामन्यांमध्ये अंपायरिंग केले आहे. आता ॲशेस २०२३ मध्ये आपली ताकद दाखवण्यासाठी ते सज्ज आहेत. ते शेवटच्या तीन कसोटी सामन्यांमध्ये अंपायरिंगची भूमिका बजावतील.

पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत नितीन मेनन म्हणाले, "जेव्हा टीम इंडिया भारतात खेळते तेव्हा खूप उत्साह असतो. भारतीय संघात असे अनेक स्टार्स आहेत जे नेहमी तुमच्यावर बाजूने निर्णय देण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करतात, जेव्हा ५०-५० च्या निर्णयाची परिस्थिती असते तेव्हा ते निर्णय त्यांच्या बाजूने फिरवण्याचा प्रयत्न करतात परंतु जर आपण दबावाखाली शांत राहू शकलो तर आम्हाला काहीही त्याचा फरक पडत नाही, ते त्यांचं काम करतात."

नितीन मेनन यांच्या या वक्तव्यानंतर टीम इंडियाचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीची चर्चा सुरू झाली आहे. गेल्या मार्चमध्ये भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेदरम्यान कोहलीने मेनन यांच्यावर भाष्य केले होते, हे सर्वांनाच आठवत असेल. खरं तर, जेव्हा ऑस्ट्रेलियन फलंदाज स्टीव्ह स्मिथला पायचीत (LBW) च्या अपीलवर मेनन यांनी नाबाद घोषित केले तेव्हा क्षेत्ररक्षण करत असताना विराट अंपायरच्या जवळ आला आणि म्हणाला की, "जर मी तिथे असतो तर तुम्ही मला आऊट दिले असते." कारण अनेकदा अंपायर्स कॉलच्या नावाखाली विराट कोहलीला मेनन यांनी बाद म्हणून निर्णय दिला आहे.

---

## साक्षी मलिक- बबिता फोगट यांच्यात 'दंगल', आंदोलन कमकुवत केल्याचा साक्षीचा आरोप

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भाजपनेत्या कुस्तीगीर बबिता फोगट यांनी स्वार्थी हेतूने कुस्तीगिरांचे आंदोलन कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ऑलिम्पिकविजेती कुस्तीगिर साक्षी मलिकने रविवारी केला. भाजपनेत्या कुस्तीगीर बबिता फोगट यांनी स्वार्थी हेतूने कुस्तीगिरांचे आंदोलन कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ऑलिम्पिकविजेती कुस्तीगिर साक्षी मलिकने रविवारी केला. त्यावर कुस्तीगीर आंदोलक काँग्रेसच्या हातातले बाहुले बनल्याचा प्रत्यारोप बबिता फोगट यांनी केला. आंदोलक कुस्तीगीर आणि भाजपचे नेते असलेले कुस्तीगीर यांच्यातील हे युद्ध आता टविटरवर भडकले आहे.

भारतीय कुस्ती संघटनेचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधातील आंदोलनाला रोज नवे वळण मिळत आहे. साक्षी मलिक आणि तिचा पती सत्यव्रत कादिअन यांनी ट्विटर या समाज माध्यमावर शनिवारी एक ध्वनिचित्रफित प्रसारित केली आहे. त्यात त्यांनी बबिता फोगट आणि भाजपनेते तिरथ राणा यांनी कुस्तीगिरांचा आपल्या स्वार्थासाठी वापर केल्याचा आरोप केला आहे.

"बबिता आणि भाजपचे आणखी एक नेते तिरथ राणा यांनी जंतरमंतरवरील आंदोलनासाठी पोलिसांकडून लेखी परवानगी घेण्यास मदत केली होती. त्याद्वारे आंदोलनामागे काँग्रेस नाही, हे सिद्ध करण्याचा त्यांचा हेतू होता. परंतु, काही दिवसांनंतर त्यांनी आमचे आंदोलन कमकुवत करण्याचा प्रयत्न केला," असा आरोप साक्षीने या ध्वनिचित्रफितीद्वारे केला आहे. तो अर्थातच बबिता आणि राणा यांनी फेटाळला आहे.

## भारताला इंटरकॉन्टिनेंटल चषक फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कर्णधार सुनील छेत्री आणि लिल्लजुआला छांगते यांनी झळकावलेल्या गोलच्या बळावर भारताने अंतिम सामन्यात लेबननला २-० असे नमवत इंटरकॉन्टिनेंटल चषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले.**




कर्णधार सुनील छेत्री आणि लिल्लजुआला छांगते यांनी झळकावलेल्या गोलच्या बळावर भारताने अंतिम सामन्यात लेबननला २-० असे नमवत इंटरकॉन्टिनेंटल चषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

सामन्याच्या पहिल्या सत्रात दोन्ही संघांच्या आक्रमणाला फारशी धार नव्हती. त्यामुळे मध्यंतरापर्यंत गोलशून्य बरोबरी होती. यानंतर ४६व्या मिनिटाला छेत्रीने गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. हा त्याचा ८७वा आंतरराष्ट्रीय गोल ठरला.

सर्वाधिक आंतरराष्ट्रीय गोल करणाऱ्या सक्रिय खेळाडूंमध्ये तो तिसऱ्या स्थानी आहे. या गोलसाठी साहाय्य (असिस्ट) करणाऱ्या छांगतेने ६६व्या मिनिटाला गोल झळकावत भारताची आघाडी दुप्पट केली.

बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या नाओरेम सिंहने छेत्रीच्या पासवर गोल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, लेबननच्या गोलरक्षकाने त्याचा प्रयत्न हाणून पाडला.

परंतु, भारताने अखेपर्यंत आघाडी राखताना विजय नोंदवला. जागतिक क्रमवारीत १०१व्या स्थानी असलेल्या भारताने दुसऱ्यांदा स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे.